।। श्री गुरुदेव ।।

# ✻ परमपूज्य अप्पांचे मनोगत ✻



परमपूज्य अप्पांनी ना कधी प्रवचन दिले, की काही लिहिले, की साधकांकडे काही खुलासा केला. त्यांचे सांगणे एकच असे की **बैठक वाढवा व आपापला अनुभव घ्या**!

परंतु श्री भाऊ देशपांडे, नाशिक यांनी श्रीकृष्ण सरस्वती स्वामींचे गद्य चरित्र प्रकाशित केले व त्यांस मात्र परमपूज्य अप्पांनी आशीर्वादस्वरूप प्रस्तावना दिली. ती प्रस्तावना पुढीलप्रमाणे आहे:

## श्री सद्गुरू माधव सरस्वती महाराज उर्फ प. पू. गुरुवर्य अप्पा यांचे आशीर्वाद

ज्ञात व प्रकट असलेल्या आजच्या युगातील पाच दत्त अवतारांपैकी देह धारणा होण्यापासून देहत्याग करेपर्यंत संपूर्ण चरित्र फक्त श्रीगुरुराज श्रीकृष्णसरस्वती स्वामींचेच उपलब्ध आहे. असे असूनही शंभर वर्षापूर्वी ओवीबद्ध प्रसिद्ध झालेले चरित्र सोडून इतर त्यांच्याबद्दल लिहिण्याचे प्रयत्न जवळ जवळ झाले नाहीत. ही उणीव डॉ. दिनकर दामोदर देशपांडे (आ. भाऊ देशपांडे) यांनी गद्यात चरित्र लिहून भरून काढली आहे. हे चरित्र जसजसे लिहिले गेले तसतसे गेले २ वर्षे पंचवटीतील (नाशिक) दत्तमंदिरात ते लिहिले जात असे व ते साधक, भक्त व भाविक यांना आवडले. तसे चरित्र लिहिल्याबद्दल श्री भाऊ कौतुकास निश्चितच पात्र आहेत.

स्वामी अत्यंत कमी बोलणारे पण अखंड भक्तांसाठी झटणारे असल्याने त्यांच्याबद्दल घडलेल्या हकिकतीपलिकडे फारसे लिहिणे कठीण होते. माणूस जेव्हा संकटात सापडतो त्यावेळी एकतर दु:खातच बुडून आपले आयुष्य व्यतीत करतो अगर ते संकट म्हणजे एक आव्हान समजून पुन्हा

जोराने जीवन जगण्यास सिद्ध होतो. असे आव्हान स्वीकारण्याचे धाडस, आपल्या पाठीशी स्वामींसारखे जगत्चालक असतील तरच शक्य होते. बाकीचे परिस्थितीला शरण जातात. स्वामी ज्यांचे पाठीशी असतात त्यांना मग नवा जोम व पुनर्जन्म झाल्याचा आनंद मिळतो.

आशीर्वादाने आयुष्याला हा जो नवा हेतु लाभतो त्याला बहुतेक चमत्कार म्हणतात व या चमत्काराची विद्या जाणण्याची इच्छा आपणास निर्माण होते. पण ही इच्छा फारच थोडयांची पूर्ण होते. याचे कारण कठोपनिषदामध्ये यमराजांनी नचिकेताला फार सुंदररित्या सांगितले आहे.

प्राचीन भारतीय विद्यापरंपरेत सर्व विद्यांचे रहस्य असलेले मूलतत्वांचे पावित्र्य अबाधित रहावे यासाठी अशा रहस्यांचे मंत्ररूपाने प्रदान करताना ही गुप्त गोपनीय विद्या जपून ठेवा. वापरा. उधळपट्टी करू नका. विद्वान जाणकार यांचे हातीच ही विद्या सुरक्षित राहू शकते.

या कारणाने शिष्य निवडताना व त्याला विद्याप्रदान करताना अखंड वरदहस्त योग्यांची गंगोत्री श्री दत्तराज हात आखडता का घेतात याचे तरी रहस्य कळू शकेल.

श्री भाऊ ही चरित्र कथा सर्वांना आवडो हीच इच्छा व आशीर्वाद.

-- माधव

***

पूर्वी १९८६ मध्ये भाईंदर येथील केशवसृष्टीत एकदा साधक शिबिर झाले होते. कै. सुरेश घैसास यांनी सांगितलेली गोष्ट आहे. जवळजवळ शंभर एक साधक जमले होते. तेव्हा परमपूज्य अप्पा सुरेश घैसासांस म्हणाले होते की मला काही बोलायचं आहे. पण त्यावेळी जोशी म्हणून एक साधक "Mind and Meditation" या विषयावर, तर श्री. पुसाळकर ‘‘गुरुकृपा व साधना’’ या विषयावर बोलले. परमपूज्य अप्पांचं बोलणं मात्र राहून गेलं.

मला वाटतं की परमपूज्य अप्पांना जे काही साधकांस सांगावयाचे होतं त्यापैकी काही भाग या वरील प्रस्तावनेत नक्कीच असला पाहिजे. वरील प्रस्तावनेवर परमपूज्य अप्पांशी बोलण्याचा योग कधी आला नाही. ते आकलन होण्याची पात्रता तेव्हा नव्हती व आताही पूर्णपणे आहे असे नाही. पण आपल्या अल्पबुद्धीने परमपूज्य अप्पांच्या मनोगताचा शोध घ्यावा असे वाटले. **त्यातून जे काही थोडंफार आकलन झाले ते मांडण्याचा एक प्रयत्न.**

१. श्रीगुरुराज श्रीकृष्णसरस्वती स्वामी हे या युगातील ज्ञात व प्रकट अशा पाच दत्तावतारांपैकी एक आहेत.

२. श्रीस्वामी अत्यंत कमी बोलणारे पण अखंड भक्तांसाठी झटणारे आहेत.

३. आपल्या संकटांच्या काळात श्रीस्वामी पाठीशी आहेत व चमत्कार घडवू शकतात.

४. ही रहस्यमय विद्या जी मंत्ररूपाने प्रदान केली जाते, ती अत्यंत पवित्र व गोपनीय आहे.

५. ही विद्या जाणण्याची इच्छा असूनही ती फक्त फार थोड्या जणांचीच कां पूर्ण होते? परमपूज्य अप्पा असे कां म्हणाले आहेत त्याचा विचार कठोपनिषदाच्या अंगाने आपण शेवटी करूया.

६. प्रस्तावनेतील राहिलेल्या परिच्छेदांवर:- याबाबतीत व्यवहारातील एक चपखल व सुंदर उदाहरण आहे. ते असे की समजा आपल्या घरी एक लहान अजाण मूल आहे. त्याच्या हातात आपण काही मौल्यवान वस्तू देऊ कां? बालवाडीतील मुलास हजार रुपयाची किंवा एक रुपयाची नोट तरी देऊ का? नाही! कारण तिचे मूल्य वा सार्थ विनियोग माहीत नसल्याने ते मूल ती नोट चुरगाळून वा फाडून टाकेल व ती नोट व्यर्थ होईल व देणे सुद्धा!! तसेच हे जे अमूल्य ज्ञान आहे, सद्गुरुंकडून ते ज्ञान प्राप्त होण्यास आपणास **आपली पात्रता वाढविणे जरूरी आहे**. ती पात्रता वाढविणे म्हणजे त्यास आवश्यक असलेले गुण आपल्या अंगी बाणविणे.

- त्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांपैकी एक महत्त्वाचा गुण म्हणजे **नम्रता**. हे आपल्या परिवारातील एका दिवंगत जेष्ठ साधकास परमपूज्य अप्पांनी प्रत्यक्ष स्वमुखाने सांगितलेले होते.
- आणखी काही गुण जे आपण परमपूज्य अप्पांकडे पाहून त्याद्वारे अंदाज बांधू शकतो, ते म्हणजे सर्वप्रथम **पराकोटीचे वैराग्य**. त्याचमुळे असलेली त्यांची अत्यंत साधी राहणी. कधी हार सुद्धा घालून घेतला नाही!
- परमपूज्य अप्पा शेवटपर्यंत आपला CA (Chartered Accountant) चा व्यवसाय करीत असत म्हणजेच **व्यावहारिक जगतातील संपूर्ण स्वयंनिर्भरता**. आपल्या शिष्यवर्गाकडून त्यांनी दीक्षासमयी ना कधी दक्षिणामूल्य घेतले ना इतरत्र केव्हा. साधकाची साधना ही स्वत:च्या उद्धारासाठी असते आणि त्यामुळे लौकिक विद्येचा वापर करून साधकाने स्वयंपूर्ण व स्वावलंबी असले पाहिजे असे त्यांचे मत होते.
- परमपूज्य अप्पांची सर्व साधकांस जी न बोलता शिकवण होती ती म्हणजे **नियमित ध्यानसाधनेवर कटाक्ष व भर**, **श्रीसद्गुरुंच्या अतुलनीय सामर्थ्यावरील विश्वास**, **श्रीसद्गुरुंप्रति दास्यभाव व शरणागति**. जीवनातील **कोणत्याही प्रसंगी श्रीसद्गुरुंवरील अढळ निष्ठा** त्यांना अपेक्षित होती.
- स्वत:च्या अध्यात्मिक अधिकाराबद्दल त्यांनी पाळलेली **कमालीची गुप्तता**. हे फार विशेष आहे.

**परमपूज्य अप्पांनी साधकांस सांगितलेल्या गोष्टी:**

- ध्यानाला बसताना उदबत्ती लावून डोळे मिटले की मी हजर असतो.
- सद्‌गुरुंचे सानिद्ध्य नित्य असते व ते शक्तिरूपाने असते.
- आपल्याकडे येणाऱ्या एका साधकाची चांगली प्रगति होत होती आणि तितक्यात त्याने श्रीगणपति अथर्वशीर्ष उपासना सुरु केली अन् त्याची प्रगति थांबली!
- काही जण नवनाथ ग्रंथाची पारायणे करतात. पण नवनाथांचे गुरु दत्तगुरु व श्रीस्वामी हे स्वत: दत्त. मग उगीच नाथांमागे जाण्यात काय उपयोग आहे!
- माझ्याशी एकरुप होण्याचा प्रयत्न कर.
- श्रीस्वामींनी आवरण घातले असल्याने शेवटचा मुक्काम गाठल्याखेरीज तुम्हाला काही कळणार नाही. नाहीतर थोडेसे दिव्य अनुभव येताच साधक विचलित होतो व प्रगति थांबते.
- या मार्गात साधकास अल्पसे जरी काही प्राप्त झाले तर तो सर्वज्ञासारखा वागू लागतो व अजून काही जाणायचे शिल्लक नाही अशी त्याची भावना होते. श्रीसद्गुरुंप्रति त्यांचा भाव ढळतो. तसे झाले तरीही तो परमोच्च प्राप्तीस मुकतो.
- परमपूज्य अप्पा काही साधकांस श्रीस्वामींच्या पोथीचे (श्रीकृष्णविजय) नित्य वाचन करण्यास सांगत. त्या पोथीतील अध्यायांत श्रीनृसिंह सरस्वती स्वामी व श्रीअक्कलकोट स्वामी यांनी विविध भक्तांना दृष्टांत देऊन मी कुंभारस्वामी या रुपात करवीर नगरात आहे व तेथे जावे असे सांगितल्याच्या कथा आहेत व त्याचे प्रत्यंतर श्रीस्वामींनी त्या त्या भक्तांना दिलेले आहे व वेळप्रसंगी तशा रुपात दर्शनही दिलेले आहे. त्यामुळे आपण श्रीस्वामींची उपासना केली की त्यात सर्व आले!

**आपल्या दीक्षेबद्दल एक खुलासा:** परमपूज्य अप्पा स्वत: सांगत की ही **आपली जी दीक्षा आहे ती साधीसुधी दीक्षा नव्हे**. परमपूज्य अप्पांच्या मुखातून हे मी स्वत: ऐकले आहे. श्री बाबामहाराज आर्वीकरांनी त्यांच्या ''दिव्यामृतधारा'' या ग्रंथात हे स्पष्टच लिहिले आहे की **फक्त बलवान परात्पर अवधूतरूप गुरुशक्तीचा प्रभावच पूर्ण कुंडलिनी जागृत करू शकतो.**

परमपूज्य अप्पांच्या मुखातील काही उद्‌गार जे आपण शिष्यवर्गाने नित्य स्मरणात ठेवले पहिजेत:

- फिकीर करू नका. आपण स्वामींची लेकरे आहोत. आपली काळजी स्वामींना.
- त्यांनी शेंडी धरली की ते शेवटपर्यंत सोडत नाहीत.
- चांगलं चाललंय. प्रगति होत असते. आपल्याला कळत नाही. माझे पूर्ण लक्ष आहे.
- ध्यानाची धुंदी चढली पाहिजे. मस्त धुंदीत रहा.

***

आता कठोपनिषदाचा विचार करूया.

# कठ-उपनिषद

हे उपनिषद कृष्ण यजुर्वेदाच्या कठ शाखेत असून त्यात दोन अध्याय व प्रत्येक अध्यायात तीन वल्ली आहेत. वाजश्रवा ऋषींचा पुत्र नचिकेत व यमराज यांच्यातील संवाद यांत वर्णिला आहे.

नचिकेताची गोष्ट तर सर्वांस माहीत आहेच. श्रीयमराजांकडून ज्ञानप्राप्ती करून घेण्यात तो सफल झाला व यमलोकातून परतून आला वा अमर झाला.

वेद व उपनिषद यांचा पाठ सुरु करण्यापूर्वी व शेवटी शान्ति पाठ करण्याचा प्रघात आहे.

।। शान्ति पाठ ।।

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।

तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

## प्रथम अध्याय

## प्रथम वल्ली

यात एकोणतीस श्लोक आहेत. सारांशाने त्याचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.

आपल्या यज्ञात वाजश्रवा ऋषी दक्षिणा म्हणून भाकड गाईंचे दान करीत असल्याचे पाहून त्यांचा पुत्र नचिकेत यास ध्यानात आले की अशा अनुचित दानाने आपले पिता नरकास प्राप्त होतील. त्यामुळे आपल्या पित्याच्या ते ध्यानी आणण्यास नचिकेताने त्यास विचारले की हे तात! आपण मला कुणास दान म्हणून देणार? दोन-तीन वेळा हा प्रश्न विचारल्यावर वाजश्रवा ऋषींनी संतापून नचिकेतास उत्तर दिले की मी तुला यमास दान म्हणून देत आहे!

त्यानुसार नचिकेत यमराजाकडे गेला. यमराज त्यावेळी बाहेर गेले असल्याने तीन दिवस नचिकेत यमराजाच्या दाराशी त्याच्या आगमनाची प्रतिक्षा करीत बसून राहिला. यमराज परत आल्यावर त्याच्या पत्नीने सांगितले की हा अतिथि ब्राह्मण आपल्या गृहात तीन दिवस न खातापिता आपली प्रतिक्षा करीत आहे. त्याचे यथोचित स्वागत करावे. ज्या गृहात ब्राह्मण अतिथि उपाशी प्रतिक्षा करतो, त्या गृहस्वामीच्या आशेच्या प्राप्तव्याचा, तसेच त्याच्या पुत्र व धनसंपदेचा नाश होतो.

यमराज नचिकेताचे स्वागत करतो, त्यांस सांगतो की आपण माझे सन्माननीय अतिथि आहात, मी आपणांस नमन करतो, स्वतःसाठी कल्याणाशीर्वादाची इच्छा व्यक्त करतो व नचिकेतास सांगतो की

आपण माझ्या गृहात माझ्या अनुपस्थितीत तीन रात्री उपाशी राहिलात त्याकारणे मी आपणांस प्रत्येक रात्रीकरता एक असे एकूण तीन वर देतो. त्याप्रमाणे नचिकेत तीन वर मागतो.

१. माझ्या पित्याचा माझ्यावरील राग नाहीसा होवो व त्याचे स्मरण त्यास न राहो.
२. स्वर्गप्राप्तीसाठी जी अग्निविद्या सांगितली गेली आहे ती कृपया मला सांगा.

यमराज नचिकेतास वरील दोन्ही वर तात्काळ प्रदान करतात.

३. ज्ञानी व्यक्ति सांगतात की मनुष्य मृत झाल्यावर त्याचा आत्मा राहतो तर काहींचे मत आहे की मृत्यूनंतर अस्तित्त्व रहात नाही. मला हे आत्मज्ञान वा आत्मरहस्य कृपया सांगा.

तेव्हा यमराज सांगतात, पूर्वी देवतांनीसुद्धा या आत्म्याबद्दल संदेह केला होता. हे आत्मतत्त्व नक्कीच सहजपणे आकळण्यासारखे नाही. तेव्हा नचिकेता तू या ऐवजी दुसरा कोणताही वर माग. तुला मी शंभर वर्षे आयुष्य असलेले पुत्रपौत्र, भरपूर गोधन, हत्ती, सुवर्ण, अश्वसंपदा, पृथ्वीचे साम्राज्य हे सर्व देतो तसेच तुझी इच्छा असेल तितकी वर्षे जगण्याचा वर मी देतो. अशा प्रकारचा अन्य कोणताही वर तुला पाहिजे असेल तो माग. धनसंपदा, अनंतकाळ उपयुक्त अशी सुखसाधने माग. तुझ्या इच्छेनुसार उपभोग मिळतील असा वर मी तुला देतो. मृत्यूलोकात जो जो दुर्लभ पदार्थ आहे तो तो माग, मनुष्यप्राण्यास प्राप्त होण्यास अशक्य अशा अप्सरांस प्राप्त करून घे, त्यांचेकडून आपली सर्व प्रकारे सेवा करून घे, पण मृत्यूनंतर आत्म्याचे काय होते हे अर्थातच् आत्मज्ञान मला विचारू नकोस.
नचिकेत यमराजास सांगतो की जी सर्व साधने आपण वर्णिली ती उद्या राहतील की नाही याबाबत आशंका आहे व ही साधने मनुष्याच्या इंद्रियांस सुद्धा क्षीण करतात, आपण जे जीवन मला देऊ केले आहे ते संपूर्ण जीवनसुद्धा भोगांसाठी अपुरे आहे. म्हणून रथादि वाहने, अप्सरा हे सर्व आपल्याकडेच राहू दे, मला यांची अजिबात इच्छा नाही. हे यमराजा, वृद्ध होऊन मृत्यूस प्राप्त होणारा कोणता विवेकी मनुष्य असेल जो देवतांनासुद्धा दुर्लभ जरामरणरहित अशा आपल्यासारख्यांची भेट झाल्यावरसुद्धा अप्सरांचे सौंदर्य, प्रेम व रतिसुखानंदासम क्षणभंगुर सुखाची अभिलाषा करेल?
हे मृत्यूदेवा, ज्या आत्मतत्त्वासंदर्भात देवतासुद्धा संदेह करतात की त्याचे अस्तित्त्व आहे की नाही या बाबतीत आपले जे काही सुनिश्चित मत आहे ते मला सांगा. हा जो अत्यंत गूढ, माझ्या मनातला वर आहे, त्याव्यतिरिक्त इतर कुठल्याही वराची या नचिकेतास इच्छा नाही.

# प्रथम अध्याय

## द्वितीय वल्ली

यमराजाने दिलेले उत्तर पुढील प्रमाणे आहे.

१. श्रेय (कल्याणकारी) व प्रेय (प्रिय वा आवडीचा - सांसारिक कामनांचा) हे दोन्ही मार्ग भिन्न आहेत. वेगवेगळे फल देणारे हे मार्ग मनुष्यास आपापल्याकडे आकर्षित करीत असतात. या

दोघांतील श्रेय मार्गास स्वीकार करणारे साधक आहेत त्यांना श्रेष्ठ फल प्राप्त होते व सांसारिक भोगांचा प्रेय मार्ग स्वीकारणारे जीवनाच्या महान उद्देशापासून दूर जाऊन पतनास प्राप्त होतात.

२. श्रेय आणि प्रेय हे दोन्ही मार्ग मानवाच्या जीवनात उपलब्ध असतात. बुद्धिवान मनुष्य विचाराद्वारे ते जाणून घेतात. विवेकी साधक भोग प्राप्त करून देणाऱ्या साधनांपेक्षा कल्याणकारी मार्ग श्रेयस्कर समजून त्याचा अंगिकार करतात. मूर्ख अविवेकी लोक मात्र योग (अप्राप्त वस्तूची प्राप्ति) आणि क्षेम (प्राप्त वस्तूचे रक्षण) यांच्या अभिलाषेने बाह्य आकर्षणास वश होऊन प्रेय मार्गाचा स्वीकार करतात.

३. नचिकेता, सांसारिक भोग विलासाच्या नश्वर साधनांचा तू विचारपूर्वक त्याग केला आहेस, भौतिक जगाच्या मायावी प्रलोभनांत अज्ञानी जन अडकून पडतात, त्या बंधनात तू अडकला नाहीस.

४. श्रेय आणि प्रेय हे विद्या आणि अविद्या अशा दोन रूपात जाणले गेलेले मार्ग एकमेकांपेक्षा संपूर्णपणे वेगळे व वेगवेगळे फळ देणारे आहेत, हे नचिकेता मी तुला श्रेय (आध्यात्मिक) मार्गाचा साधक मानतो कारण की तू भोगविलासाच्या साधनांने प्रलोभित झाला नाहीस.

५. अविद्या अंध:कारात स्थित असून सुद्धा स्वत:ला विद्वान व विशेष श्रेणीचे मानणारे मूढ जन अनेक वाईट मार्गांचा अवलंब करताना अंध व्यक्तींच्या सहायाने जाणारे अंध व्यक्ति जशा ठोकरा खातात तसे धडपडतात.

६. धनाच्या लोभाने व्याप्त झालेल्या मनुष्याच्या अंतरंगात पारलौलिक विचारांचा उदय व वृद्धि होत नाही कारण तो प्रत्यक्षवादावर आधारित जीवनाच्या अस्तित्त्वासच मानतो. आध्यात्मिक जीवनाच्या अस्तित्वास नाकाराणारे देहाभिमानी मनुष्य परत परत जन्म मृत्यूच्या बंधनात फिरत फिरत माझ्या (यमराजाच्या) आधीन रहातात.

७. साधारण जनांस आत्मज्ञानाच्या संबधात जाणण्याची संधी सुद्धा मिळत नाही, जर दैववशात् अशी संधी मिळाली तरी बहुतांश लोकास ज्ञानप्रकाशाच्या अभावी आपले जीवन त्यानुसार व्यतीत करण्यास सक्षम नसतात. ते तत्त्वज्ञान योग्य प्रकारे प्रतिपादन करणारेसुद्धा अतिशय असामान्य असतात. ते ज्ञान ग्रहण करण्यास सुद्धा कुशल जिज्ञासूच सुपात्र असतो. कुशल आचार्याद्वारा उपदेश केला गेलेला ज्ञाता सुद्धा असामान्य वा अनन्यसाधारण असतो.

८. अनधिकारी मनुष्याद्वारे (ज्याला त्याचा साक्षात्कार झालेला नाही) विविध कल्पनेच्या सहाय्याने सांगितले गेलेले हे आत्मतत्त्व आकळण्यास सहज नाही. आत्मदर्शी ज्ञात्याकडून समजाविले गेले तरच त्याचा लाभ होऊ शकतो. अत्यंत गूढ व सूक्ष्म असल्याने ते तर्काद्वारे जाणले जाऊ शकत नाही.

९. हे प्रिय नचिकेता, शुष्क तर्क विर्तर्क करणाऱ्या बुद्धीपेक्षा श्रेष्ठ आत्मज्ञानास लागणारी प्रखर अशी तुझी बुद्धि आहे. खरोखरच तू खरा सत्यशोधक आहेस. मला तुझासारखाच जिज्ञासू शिष्य लाभो.

१०. मी जाणतो की कर्मफलजन्य सम्पदा अनित्य (नश्वर) आहे व अनित्य (नश्वर) साधनांनी नित्याची (आत्मतत्त्व) प्राप्ति होणे शक्य नाही. माझ्याकडून नाचिकेत अग्नि प्रदीप्त करून त्यात अनित्य द्रव्य समर्पण करून मी नित्य (आत्मतत्त्व) प्राप्त केले आहे.त्यामुळेच मी अधिकार प्राप्त करून मी यमपद प्राप्त केले आहे.

११. हे नचिकेता! तू खरोखरच बुद्धिमान व निश्चयी आहेस. स्तुतिप्राप्त महत् ब्रह्म व विशेष प्रशंसनीय स्थानास पाहून त्यासाठी तू विविध कामनांची प्राप्ति, जगाची प्रतिष्ठा, यज्ञफलाचे अनंतत्त्व धैर्याने या सर्वाचा त्याग केला आहेस.

१२. त्या दुष्करतेने ज्ञात होणाऱ्या गूढ गहन स्थानी अन्तर्यामी, बुद्धिमध्ये रहाणाऱ्या पुरातन पुरुषास, देवास अध्यात्मद्वारा जाणून बुद्धिमान पुरुष हर्ष शोकांपासून मुक्त होतो.

१३. मनुष्य या आत्मतत्त्वाबद्द्ल ऐकून व त्याचे आकलनाद्वारे हे सूक्ष्म ज्ञान प्राप्त करतो, त्या आनंदकेंद्रास प्राप्त करून आनंदित होतो. नचिकेता मी तुला ब्रह्मभवनास योग्य वा लायक समजतो.

१४. हे यमराज! धर्म-अधर्माच्या परे, कर्म-अकर्माच्या परे, भूत-भविष्याच्या परे असे जे आपण पाहता त्या परम आत्मतत्त्वासंबधी मला सांगा.

१५. यमराज सांगतात सगळे वेद ज्याचे वर्णन करतात, सर्व तपश्चर्या ज्याचे वर्णन करतात, ज्याच्यासाठी साधकजन ब्रह्मचर्याचे पालन करतात, त्याचे मी थोडक्यात वर्णन करतो. ते ॐ आहे.

१६. हेच अक्षर ब्रह्म आहे. हेच श्रेष्ठ अक्षर आहे. यांस जाणून घेऊन जो ज्याची इच्छा करेल ते त्यास प्राप्त होते.

१७. हेच श्रेष्ठ आलंबन आहे. हेच उच्च आलंबन आहे. यास जाणून मनुष्य ब्रह्मलोकात महान होतो.

१८. हा उत्पन्न होत नाही, मरत नाही, हा अन्य कशातून निर्माण झालेला नाही वा हा कशास निर्माण करीत नाही. हा (आत्मा) अजन्मा, नित्य शाश्वत, आणि क्षय व वृद्धिरहित आहे. शरीर नष्ट झाल्यावर सुद्धा हा नष्ट होत नाही.

१९. मारणारा जर स्वत:ला तसे (मी मारणारा आहे) समजला व मारला गेलेला जर स्वत:स तसे मानत असेल तर दोघांसही आत्मतत्त्व कळलेले नाही. कारण हा आत्मा न कुणास मारतो वा ना कुणी याचा नाश करू शकतो.

२०. अणूपेक्षाही सूक्ष्म व महानापेक्षा महान आत्मा जीवाच्या हृदयरूपी गुहेत स्थित आहे. निष्काम पुरुष इंद्रियांच्या प्रसादाने या आत्म्याच्या महिमेस जाणतो व शोकरहित होतो.

२१. स्थित असूनही तो दूर जातो, झोपलेला असूनही सर्वत्र जातो. हर्षयुक्त व मदरहित अशा या देवाला माझ्याशिवाय आणखी कोण जाणू शकेल?

२२. हा शरीररहित आहे पण सर्व शरीरांत व्यापून आहे, अनित्य असून नित्यस्वरूप आहे. या महान आत्म्यास जाणून बुद्धिमान पुरुष शोकरहित होतो.

२३. हा आत्मा प्रवचनाने लाभत नाही ना बुद्धीने ना शास्त्राध्ययन करून जाणला जाऊ शकतो. ज्याच्यावर त्याची (आत्म्याची) कृपा होते, तोच त्यास जाणू शकतो. हे आत्मतत्त्व अधिकारी साधकाच्या समोर आपले वास्तविक स्वरूप प्रकट करते.

२४. जो पापकर्मापासून निवृत्त झालेला नाही, ज्याची इंद्रिये शांत नाहीत, ज्याचे चित्त अशांत आहे तो बुद्धिद्वारा या आत्म्यास प्राप्त करून घेऊ शकत नाही.

२५. ब्राह्मण व क्षत्रिय ज्याचे भोजन आहेत व मृत्यू ज्याची भाजी आहे असा तो (आत्मा भोक्ता आहे) कोठे आहे त्यास कोण जाणू शकणार.

## प्रथम अध्याय

## तृतीय वल्ली

१. जे पंचाग्निसाधन करणारे, तीन नाचिकेत-अग्नीस प्रदीप्त करणारे ब्रह्मज्ञानी, जे पुण्यलोकात अमृत पिणारे व उच्चस्थानावर विराजमान आहेत ते आत्मा-परमात्मा यांस छाया व प्रकाशाप्रमाणे वर्णितात.

२. यजन करणाऱ्यांचा जो सेतु, संसारसागर पार करणाऱ्यांसाठी निर्भय किनारा वा आश्रय आहे त्या नाचिकेत-अग्नीस जे अक्षर श्रेष्ठ ब्रह्म आहे त्यास जाणण्यास आम्ही समर्थ व्हावे.

३. शरीर हा रथ, आत्मा हा शरीराचा स्वामी, बुद्धि ही सारथि व मनास इन्द्रियरुपी अश्वांस नियन्त्रित करणारा लगाम जाण.

४. इन्द्रियांना अश्वाची उपमा दिली आहे व विषयांस या अश्वांस विचरण्याचा मार्ग म्हटले आहे. अशा प्रकारे शरीर, इन्द्रिय व मन यांनी युक्त अशा आत्म्यास सुखदु:खादि भोग घेणारा भोक्ता संबोधिले आहे

५. नित्य विवेकहीन व अनियंत्रित इन्द्रिये असलेला, ज्याची इन्द्रिये उच्छुङ्खल झालेली असतात जसे की अविवेकी सारथ्याचे दुष्ट वा मत्त अश्व.

६. परन्तु विवेकी बुद्धि व नियन्त्रित मन असलेल्यांची इन्द्रिये, श्रेष्ठ सारथ्याचे गुणी अश्वांप्रमाणे नियंत्रित असतात.

७. अविवेकी, निग्रहरहित मन व नेहमी अशुद्ध राहणारा कधी परमपद प्राप्त करू शकत नाही, उलट वारंवार जन्ममरणाच्या चक्रात फिरत रहातो.

८. परन्तु विवेकी बुद्धि, नियन्त्रित मन व सदैव पवित्र राहणारा त्या परमपदास प्राप्त करतो, जेथून पुनरागमन होत नाही.

९. विवेकी बुद्धिरूप सारथि व संयत मन असलेला संसार सागर पार करून विष्णूच्या परमपदास प्राप्त करतो.

१०. इन्द्रियांपेक्षा विषय श्रेष्ठ, विषयांपेक्षा मन, मनापेक्षा बुद्धि आणि बुद्धिपेक्षासुद्धा हा महान आत्मा श्रेष्ठ आहे.

११. जीवापेक्षा ईश्वराची अव्यक्त शक्ति श्रेष्ठ आहे, अव्यक्त शक्तीपेक्षा परमपुरुष श्रेष्ठ आहे. त्या परमपुरुषापेक्षा श्रेष्ठ आणखी इतर काहीही नाही. तीच पराकाष्ठा व परमगति आहे.

१२. सर्व प्राणीमात्रांत लपलेले हे आत्मतत्त्व प्रकाशित होत नाही, सूक्ष्म दृष्टी असणारे तत्वदर्शीयांस आपल्या तीव्र व सूक्ष्म बुद्धीनेच त्याचे दर्शन होते.

१३. विवेकी पुरूषाने वागेन्द्रिये मनात लीन करावी, मनाचा ज्ञानस्वरूप बुद्धीत लय करावा, बुद्धि महत्तत्त्वात स्थिर करावी व शेवटी त्याचा शान्त आत्म्यात लय करावा. (निन्म तत्त्वांचा उच्च तत्त्वात लय करावा.)

१४. उठा, जागे व्हा, ज्ञानीजनांकडे जाऊन ज्ञान प्राप्त करा. तलवारीच्या धारेवर चालण्यासारखा हा मार्ग कठीण आहे.

१५. शब्द स्पर्श रूप रस गंध यांच्या पलिकडे असलेले अविनाशी, अनादि, अनन्त व महत्तत्त्वाच्या पेक्षा श्रेष्ठ अशा आत्मतत्त्वास जाणून घेऊन पुरुष मृत्यूच्या तावडीतून सुटतो, त्याच्या पार होतो.

१६. नचिकेताद्वारे प्राप्त झालेल्या व मृत्यूद्वारे सांगितल्या गेलेल्या या सनातन विज्ञानास सांगून व ऐकून बुद्धिमान पुरुष ब्रह्मलोकात प्रतिष्ठा पावतात.

१७. तो पुरुष या परमगुह्य ग्रंथास पवित्रतापूर्वक ब्राह्मणांच्या सभेत वा श्राद्धकालात ऐकवितो त्याचे ते श्राद्ध अनंत फळ देणारे होते, अनंत फळ देणारे होते.

~ ~ ~ ~

# द्वितीय अध्याय

## प्रथम वल्ली

१. स्वयंभू परमात्म्याने सर्व इन्द्रियद्वारे बहिर्मुख करून ठेवलेली आहेत, त्यामुळे जीव बाह्य विषयांसच पहातो, अन्तरात्म्यास नाही. अमरत्व प्राप्त करण्याच्या दृष्टीने ज्याने आपल्या चक्षु वगैरे इन्द्रियांवर संयम प्राप्त केलेला आहे असा कुणी धैर्यवान पुरुषच अंतरात्म्यास पाहू शकतो.

२. मूढ् पुरुष भोगांच्याच पाठी लागतात, ते मृत्यूच्या जाळ्यात अडकतात. परन्तु विवेकी पुरुष अमरत्व स्थिर जाणून जगातील अनित्य पदार्थांची कामना करीत नाहीत.

३. ज्या आत्म्याच्या द्वारा मनुष्य रूप रस गंध शब्द स्पर्श आणि मैथुनजन्य सुखांचा अनुभव करतात व त्याच्याच कृपेने हे जाणतात की त्याच्या व्यतिरिक्त काय शिल्लक रहाते, नचिकेता तेच ते तत्त्व आहे.

४. ज्याच्या द्वारा मनुष्य जागृति वा स्वप्न या दोहोत दिसणाऱ्या पदार्थांस पाहू शकतो, त्या महान सर्वव्यापी आत्म्यास जाणून बुद्धिमान पुरुष (कधीही, कुठल्याही परिस्थितीत) शोक करत नाही.

५. जो पुरुष या कर्म फलभोक्त्यास व प्राणादिक धारण करणाऱ्या आत्म्यास त्याच्या निकट राहून भूत भविष्याच्या शासकरूपाने जाणतात, त्यांना या स्वरूपाचे कधी विस्मरण होत नाही, ते न कुणाची निन्दा ना तिरस्कार करतात. तेच हे आत्मतत्त्व आहे.

६. जे आपल्या तपाने जल इत्यादि पंचमहाभूतांच्या सुद्धा आधी उत्पन्न झालेल्या व सर्वांच्या हृदय गुहेत स्थित असलेल्या ब्रह्मास या रूपात पहातात, तेच खरे पाहतात व निश्चितपणे तेच हे ब्रह्म आहे.

७. जी देवतामयी आदिति प्राणाच्या बरोबर उत्पन्न झालेली आहे व बुद्धीत प्रविष्ट होऊन स्थिर झालेली आहे, ती भूतमात्रांद्वारा अनेक रूपाने प्रकट होते तीच हे तत्त्व आहे.

८. गर्भवती स्त्रियांमध्ये जसा गर्भ पोषण होत आहे त्याप्रमाणे दोन अरणींच्या मध्ये जातवेद अग्नि अप्रकट आहे व जो प्रमादशून्य तसेच होमसामुग्रीने युक्त पुरुषांद्वारा नित्य पूजनीय आहे. तोच हे ब्रह्म आहे.

९. जेथून सूर्य उदय पावतो व जेथे मावळतो तेथे सर्व देवतांच्या शक्ति विद्यमान आहेत, त्यांचे कुणी उल्लंघन करीत नाहीत. तोच हा आहे.

१०. जे येथे आहे तेच तेथे आहे व जे तेथे त्या परलोकात आहे तेच या लोकात आहे. जो याच्यात भेददृष्टीने पाहतो तो मृत्यूद्वारा मृत्यूस प्राप्त होतो.

११. शुद्ध मनानेच परमात्मतत्त्व जाणले जाऊ शकते. या जगात ईश्वराव्यतिरिक्त आणी काहीच नाही, परन्तु जो मनुष्य यात भेददृष्टीने पाहतो तो मृत्यूद्वारा मृत्यूस प्राप्त होतो.

१२. भूत भविष्याचा स्वामी अंगुष्ठमात्र पुरुष आपल्या अंत:करणात राहतो, त्याला जाणणारा पुरुष कुणाची निंदा करीत नाही. तोच हा आहे.

१३. भूत भविष्याचा स्वामी अंगुष्ठमात्र पुरुष धूमरहित ज्योती सारखा आहे. तो जसा आज आहे तसाच उद्याही राहील. तोच हा आहे.

१४. जसे पर्वतशिखरावर पडलेले पाणी पर्वतावर सर्व बाजूनी वाहते त्याप्रमाणे विभिन्न धर्मांना जो परमेश्वरापासून भिन्न मानतो तो पण असाच भटकत रहातो.

१५. ज्याप्रकारे शुद्ध पाण्यात शुद्ध पाणी टाकले तर शुद्धच रहाते, त्याच प्रकारे हे नचिकेता विज्ञानसंपन्न मुनीस हा आत्मा सर्वत्र एकरसच दिसतो.

# द्वितीय अध्याय

## द्वितीय वल्ली

१. अजन्मा आत्म्याचे नगर अकरा द्वारांचे आहे. त्याचे निष्ठापूर्वक अनुष्ठान करणारे कधी शोक करीत नाहीत व देहात असतानाच मुक्त होतात. तोच हा आहे.

२. तो हंस, शुद्ध स्थानी रहाणारा, घरात रहाणारा, अतिथि, यज्ञवेदीवर स्थित अग्नि सुद्धा तोच आणि आहुति देणारा सुद्धा तोच आहे. मनुष्यांमध्ये श्रेष्ठ देव, पितृ आदि रूपांमध्ये तेच प्रतिष्ठित आहे. सत्य, आकाशात निवास करणारा, जल, पर्वत आदि यामध्ये असणारा असा आत्मा हे एक महान सत्य आहे.

३. जो प्राणास उर्ध्वगामी व अपानास अधोगामी करतो, त्या हृदयाच्या मध्यभागी स्थित असलेल्या वामनाची (भजनीयाची) सर्व देवता उपासना करतात.

४. या शरीरातील देही शरीर सोडून जातो तेव्हा त्या शरीरात काय शिल्लक रहाते? तोच (सोडून गेलेला) ब्रह्म आहे.

५. कुणीही मनुष्य ना प्राणामुळे जिवंत रहातो ना अपानामुळे. पण ज्याचे हे आश्रित आहेत अशा अन्य गोष्टीमुळेच ते जिवंत रहातात.

६. हे गौतमा, आता मी तुला त्या गुह्य व सनातन ब्रह्माचे वर्णन करतो की मृत्यू नंतर आत्म्याचे काय होते.

७. अनेक जीव आपले कर्म व ज्ञान यांच्यानुसार दुसरे शरीर प्राप्त करण्यास योग्य योनीमध्ये प्रवेश करतात व दुसरा देह धारण करतात. आणि इतर स्थावर (वृक्ष, लता, पर्वत आदि) अवस्था प्राप्त करतात.

८. समस्त जीवांच्या कर्मानुसार त्यासाठीच्या भोगांचे निर्माण व व्यवस्था करणारा परमपुरुष सर्वांच्या निद्रेतही जागृत असतो. तोच शुद्ध आहे, तेच ब्रह्म आहे आणि अमृत म्हणून ओळखिले जाते. त्यास कुणी उल्लंघू शकत नाही व समस्त लोक त्याच्या आश्रयाने रहातात. तेच ब्रह्म आहे.

९. ज्याप्रकारे एकच अग्नि सर्व ब्रह्मांडात व्यापून त्या त्या वस्तूप्रमाणे होतो, त्याचप्रकारे सर्व प्राणीमात्रात स्थित अंतरात्मा वा ब्रह्म एक असूनही अनेक रूपात भासमान होते. तेच त्यांच्या बाहेरसुद्धा आहे.

१०. ज्याप्रमाणे एकच वायु या लोकात संचरलेल्या प्रत्येक रूपात त्या त्या प्रमाणे झालेला आहे, त्याचप्रमाणे सर्व प्राणीमात्रात विद्यमान परमात्मा एक असूनही विभिन्न रूपाप्रमाणे प्रतीत होतो. तो त्यांच्या बाहेरसुद्धा आहे.

११. ज्याप्रकारे सूर्य सर्व लोकांचा चक्षु (डोळा) आहे व तो डोळ्यांच्या दोषाने लिप्त होत नाही त्याचप्रमाणे सर्व लोकांचा अंतरात्मा, जो बाहेर सुद्धा आहे, तो लौकिक दु:खाने लिप्त होत नाही.

१२. सर्व शरीरधाऱ्यात अन्तरात्म्याच्या रूपाने वास करणारा व सर्वांना कह्यात ठेवणारा परब्रह्म एक असूनही अनेक रूपे धारण करतो. जे बुद्धिमान आपल्या अंत:करणात स्थित असलेल्या त्याचे नित्य दर्शन करतात तेच शाश्वत सुखास प्राप्त होतात, इतर नाही.

१३. जे समस्त चैतन्यातील चैतन्य,अनित्यातील नित्य आहे, जे एकटेच अनेकांची कामना पूर्ण करते, त्या आपल्यातील स्थित असलेल्याचे जे बुद्धिमान दर्शन करतात तेच शाश्वत शांति प्राप्त करतात, इतर नाही.

१४. त्या अनिर्वचनीय आनंदासच विद्वज्जन ब्रह्म मानतात. त्या ब्रह्मास कशा रितिने जाणले जाईल? ते काय प्रत्यक्ष प्रकट होते आणि अनुभवाने जाणण्यायोग्य आहे?

१५. तेथे न सूर्य प्रकाशित होतो, न चंद्र, ना तारांगण ना विद्युल्लता प्रकाशित होते, मग हा लौकिक अग्नि कसा प्रकाशित होऊ शकेल? त्याच्या (परब्रह्माच्या) प्रकाशानेच हे सर्व प्रकाशित होते. सम्पूर्ण जगत् त्याच्याच प्रकाशाने प्रकाशित होते.

# द्वितीय अध्याय

## तृतीय वल्ली

१. ज्याचे मूळ वर व शाखा खालच्या बाजूस आहेत ते अश्वत्त्थ वृक्ष सनातन आहे. तेच बल आहे, तेच ब्रह्म आहे, त्यालाच अमृत म्हटले आहे. सर्व लोक त्याच्या आश्रयाने रहातात, कोणीही त्याचे उल्लंघन करू शकत नाही. तेच हे ब्रह्म आहे.

२. हे सर्व जगत् प्राणरूप ब्रह्मापासून प्रकट होऊन त्याच्यापासूनच गतिमान आहे. जे उगारलेल्या भयंकर वज्रासमान असलेल्या या ब्रह्मास जाणतात ते अमर होतात.

३. याच्या भयाने अग्नि तापतो, सूर्य तापतो, याच्या भयाने इन्द्र व वायु तथा पाचवा मृत्यू धावतो.

४. जर देहात असताना देहपतनापूर्वीच कुणी याला जाणू शकला तर तो बन्धनातून मुक्त होतो, अन्यथा तो या जन्ममरणयुक्त लोकात शरीर धारण करून (जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकून) राहतो.

५. जशा प्रकारे आरश्यात, त्याच प्रकारे निर्मळ बुद्धीत आत्म्याचे (स्पष्ट) दर्शन होते.तसेच जसे स्वप्नात तसे पितृलोकात आणि जसे पाण्यात तसे गन्धर्वलोकात त्याचे (अस्पष्ट) भान होते; परन्तु ब्रह्मलोकात त्याचा छाया व प्रकाशाच्या प्रमाणे (स्पष्ट) अनुभव होतो.

६. वेगवेगळ्या भूतांपासून उत्पन्न झालेल्या इन्द्रियांचे विविध भाव वा गुणधर्म व त्यांचे उत्पत्ति व नाश यांना जाणून बुद्धिमान पुरुष शोक करीत नाही.

७. इन्द्रियांपेक्षा मन श्रेष्ठ आहे, मनापेक्षा बुद्धि आणि बुद्धिपेक्षासुद्धा महतत्त्व श्रेष्ठ आहे, महतत्त्वापेक्षा अव्यक्त प्रकृति श्रेष्ठ आहे.

८. अव्यक्त प्रकृतीपेक्षा परमपुरुष श्रेष्ठ आहे, जो सर्वव्यापक व लक्षणरहित आहे, त्याला जाणून मनुष्य मुक्त होतो व अमरत्वास प्राप्त होतो.

९. त्याचे रूप दृष्टीच्या आवाक्यात येत नाही. कुणी यास डोळ्याने पाहू शकत नाही. हृदय, बुद्धि व मन यांनी ते जाणले जाऊ शकते व जो यास जाणतो तो अमर होतो.

१०. जेव्हा मन व पाचही ज्ञानेन्द्रिये यात स्थित होतात व बुद्धीसुद्धा विचलित होत नाही त्यास परमगति म्हटले आहे.

११. या स्थिर इन्द्रियधारणेसच योग म्हटले आहे. त्यावेळी पुरुष प्रमादरहित होतो परन्तु हा योग उत्पन्न व नाश होतो (ती स्थिति कायम ठेवण्याचा अभ्यास करावा लागतो)

१२. वाणी मन व नेत्र याद्वारा त्याला प्राप्त करणे अशक्य आहे. 'तो आहे' असे सांगणाऱ्यापेक्षा इतर ठिकाणी तो कसा उपलब्ध होऊ शकतो? (ज्यांनी त्याला जाणले त्यांनीच त्याला जाणले, इतरांनी नाही)

१३. अस्ति नास्ति या दोन्ही भावापैकी अस्ति म्हणजे 'तो आहे' या भावानेच त्याला जाणणे इष्ट आहे. त्या भावानेच त्याचे तत्त्वस्परूप स्पष्ट होते.

१४. जेव्हा हृदयातील सर्व कामना नष्ट होतात तेव्हा मनुष्य अमर होतो व इथेच ब्रह्मभावास प्राप्त होतो.

१५. जेव्हा हृदयातील सर्व ग्रंथींचा भेद होतो, तेव्हाच मर्त्य अमर होतो हाच वेदान्ताचा आदेश आहे.

१६. हृदयात एकशे एक नाड्या आहेत त्यातील एक मस्तकाकडे जाते. त्या मार्गाने वर जाणारा मनुष्य अमर होतो. इतरत्र पसरलेल्या नाड्या विविध गति (विविध योनीत जन्म) देतात.

१७. अंगुष्ठमात्र अंतरात्मा पुरुष सर्व प्राणीमात्रांच्या हृदयात निवास करतो, गवतातील अन्कुर जसा काढता येतो त्याप्रमाणे त्याला शरीरापासून बाहेर काढा. त्याला शुद्ध व अमृतस्वरूप (अमर) समजा.

१८. यमराजाकडून सांगितली गेलेली ही विद्या व संपूर्ण योगविधी जाणून नचिकेत ब्रह्मस्थितीस प्राप्त होउन शुद्ध व अमर झाला. जो इतर कुणी या अध्यात्मविद्येस जाणेल तोसुद्धा असाच अमर होईल.

।। शान्ति पाठ ।।

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै ।

तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

***

या कथेत नचिकेताचे दिसून येणारे गुण पुढीलप्रमाणे आहेत:

✻ योग्य-अयोग्य जाण ✻ निर्भीडता ✻ आज्ञापालन ✻ निर्भयता ✻ तितिक्षा ✻ नम्रता ✻ जिज्ञासा ✻ विवेक ✻ अनासक्ति वा वैराग्य ✻ पितृप्रेम

**सारांशाने पाहता साधकाची जिज्ञासा, तळमळ, श्रेयस् व प्रेयस् यातील भेद ओळखून निवाडा करण्याइतका प्रगल्भ विवेक व त्याप्रमाणे जीवनात प्राधान्यता देऊन तसे वागण्याचा निर्धार हा विद्याप्राप्तीस सहायक ठरतो व असा शिष्य श्रीसद्गुरुंच्या पूर्णकृपेस पात्र ठरतो.**

श्रीगुरुराज दत्तराज श्रीकृष्णसरस्वती स्वामींनी आपणा सर्वांचा शिष्य म्हणून करूणेने अंगिकार करून कृपा तर केलेलीच आहे व त्या निवडक शिष्यसमुदायात आपला समावेशही झालेला आहे. **आता आपले कर्तव्य आहे की त्यांचा विश्वास सार्थ ठरवून त्या परमोच्च प्राप्तीसाठी आपली पात्रता सर्वार्थाने सिद्ध करणे.** आज परमपूज्य अप्पांच्या जन्मतारखेस आपण हा संकल्प करणे अन् त्यानुसार आपले जीवन व साधनामार्ग आक्रमिणे याखेरीज श्रीसद्गुरूंस आनंददायी ते आणखी काय असणार!!

-- सुदेश

(१३ जून २०१६)